पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ५९

<u>सभावृत्तांत</u>

दिनांक - ०७/०५/२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ०७/०५/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. जगताप नवनाथ दत्तू - सभापती
२) मा. अविनाश (दादा) टेकावडे
३) मा. चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा. विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा. छाया जगन्नाथ साबळे
६) मा. महेशदादा किसन लांडगे
७) मा. बारणे माया संतोष
८) मा. धराडे शकुंतला भाऊसाहेब
९) मा. लोंढे गणेश नारायण
१०) मा. भोंडवे संगिता राजेंद्र
११) मा. शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.मुंढे, मा.कारचे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.टेकाळे, मा.झुरे, मा.दुरगुडे, मा.फुंदे – सहाय्यक आयुक्त, मा.घाडगे- मुख्य लेखापरीक्षक, मा.गावडे - नगरसचिव, मा.सुरगुडे,- विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.काची – सह शहर अभियंता, मा.गायकवाड – प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.पवन साळवे- अति. वैद्यकिय अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.चिंचवडे, मा.बरशेट्टी, मा.सय्यद ,मा.साळवी, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.रामदास जाधव, – कार्यकारी अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.चव्हाण –आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पोमण – संगणक अधिकारी, मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------------

<u>**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-**</u>

<u>**विषय क्रमांक - १६)**</u> दापोडी जकात नाक्याचे भाडे अदायगीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

----------

दिनांक ३०/४/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक - ५८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३३४८ विषय क्रमांक – १
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग – मध्यवर्तीसाहित्य भांडार
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.मसाभां/५/कावि/२३८/२०१३दि.१०/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या इमारती मधील कॉरीडॉर (कॉरीडॉर, इनडोअर, संडास, बाथरुम, मुता-या), अंतर्गत व बाहय परिसराची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणेकामी सध्या काम करीत असलेल्या मे.बी.व्ही.जी.इंडिया लि, यांनाच (पुर्वीच्या झालेल्या करारनाम्यास अधिन राहून) नविन ई-निविदेची संपूर्ण कार्यवाही होवून कामाचा आदेश देईपर्यंत लागणारे अंदाजे तीन महिन्याचे कालावधी करीता मुदतवाढ देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी मनपा वाय.सी.एम. रुग्णालयांच्या इमारतीमधील कॉरिडॉर (कॉरीडॉर, इनडोअर, संडास, बाथरुम, मुता-या), अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई व स्वच्छता करणेकामी सध्या काम करीत असलेल्या मे.बी.व्ही.जी.इंडिया लि, यांचे काम समाधानकारक असल्याने व करारनाम्यातील मुदतवाढीच्या तरतुदीनुसार दिनांक ५/४/२०१३ पासून पुढील पाच वर्षे कालावधीकरिता किमान वेतनदराप्रमाणे मुदतवाढ देऊन व आर.वी.आय. इंडेक्सप्रमाणे त्यास लागणारे यंत्रसामग्री व रसायने यांच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ व घट दरानुसार फरकाची रक्कम अदा व वसुल करणे बंधनकारक राहील व या अटीस अधीन राहून त्यांच्या बरोबर करारनामा करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३४९ विषय क्रमांक – २
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/६/कावि/४४१/२०१३ दि.९/४/२०१३.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.३/७९/२०१२-१३ मधील अ.क्र.२९ अन्वये, से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रातील क्लोरीनेटर्स व क्लोरीन हाऊसची व्यापक देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी मे.अचला इंजिनिअरींग अँण्ड इलेक्ट्रॉनिक्स (नि.र.रू.९,२७,८०४/- [र.रू.नऊ लाख सत्तावीस हजार आठशे चार] पेक्षा ०.१५ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५०	विषय क्रमांक – ३
दिनांक – ०७/५/२०१३	विभाग – स्थापत्य
सुचक – मा.महेशदादा लांडगे	अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भः- **मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/१२४/२०१३ दि.२५/४/२०१३.**

विषय - मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२०१२-१३ मधील अ.क्र.८२ अन्वये, प्रभाग क्र.४८ (जुना वॉर्ड क्र.७६) मधील ठिकठिकाणी डी.पी.व नॉन डी.पी. रोडच्या कडेने फुटपाथ करणेबाबत.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५१	विषय क्रमांक – ४
दिनांक – ०७/५/२०१३	विभाग – स्थापत्य
सुचक – मा.शकुंतला धराडे	अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/८२/२०१३ दि.२५/४/२०१३.

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.९५ अन्वये, इंद्रायणीनगर येथिल संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल मधील स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.श्रीकृपा एंटरप्रायजेस (नि.र.रु.१८,६७,३२५/- [र.रू.अठरा लाख सदुसष्ट हजार तीनशे पंचवीस] पेक्षा ९.९० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१७,६६,५८३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे बाजारभावानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५२	विषय क्रमांक – ५
दिनांक – ०७/५/२०१३	विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.महेशदादा लांडगे	अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/२३०/२०१३दि.२५/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागांसाठी आवश्यक संगणक सटेशनरी साहित्य खरेदीकामी ई-नि.क्र.११/३/२०१२-१३ अन्वये लघूत्तम निविदाकार मे. एम. के. एंटरप्रायजेस, पुणे यांचे संगणक स्टेशनरी एकूण ११ बाबी साहित्याचे दर एकुण र.रु.७,२०,४१०/-, मे.झूम काम्पुटर्स यांचे संगणक स्टेशनरी साहित्य एकूण ४ बाबी साहित्याचे दर एकूण र.रु.१,१६,७९५/- व मे.इंदू इन्फोटेक सोल्यूशन, भोसरी यांचे संगणक स्टेशनरी साहित्य एकूण ६ बाब साहित्याचे दर एकूण र.रु. ३,०२,८७०/-, मे.ओअेसेस एंटरप्रायजेस,पिंपरी,यांचे संगणक स्टेशनरी साहित्य एकूण ५ बाबी साहित्याचे दर एकूण र.रु. ६,२४,७५०/-व मे.कॉम्पुलाईन, पिंपरी यांचे संगणक स्टेशनरी एकूण ४ बाबी साहित्याचे दर एकूण र.रु.१,२९,०५०/- असे एकत्रित एकूण र.रु.१८,९३,८७५/- दर स्विकृत करून, करारनामा केलेला असल्याने प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५३ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग – वायसीएमएच
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- **मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.वायसीएमएच/१/कावि/१०३/२०१३ दि. २३/४/२०१३.**

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कै. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील एक्स-रे विभागामध्ये काम करणारे कर्मचा-यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून रेडिएशन बॅजेस तपासणीकामी मे.रेननटेक प्रा.लि. गिरगांव मुंबई यांनी सादर केलेले अँडव्हान्स बिल र.रु.24,918/- (र.रु.चोवीस हजार नऊशे अठरा) त्यांना अदा करावयाचे असलेने सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५४ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक - मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/२३३/२०१३ दि.२५/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाचे विविध विभागाकडील कागदपत्रे/नस्ती/नकाशे स्कॅनिंग व डिजीटायजेशन करुन जतन करणे कामी ई-नि.क्र.३७/२०१२-१३ अन्वये लघूत्तम निविदाकार मे.प्युजन वन इन्फो आयटी प्रा.लि. यांचे एकूण ४ बाबींसाठी पार्ट ए मधील बाब क्र.१ चे ***A4/Legal Size Paper*** साहित्याचे दर एकूण र.रु.६०,००,०००/-, पार्ट ए मधील बाब क्र.२ चे ***A1/AO Size Paper*** साहित्याचे दर एकूण र.रु.२,२४,०००/-,पार्ट ए मधील बाब क्र.3 चे ***A3/A2 Size Paper*** साहित्याचे दर एकूण र.रु.८४,०००/- व पार्ट सी मधील ***Application Software*** चे साहित्याचे दर एकूण र.रु.४,००,०००/- असे एकत्रित एकूण र.रु.६७,०८,०००/- दर स्विकृत करून करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरीही मे.प्युजन वन इन्फो आयटी प्रा.लि. हे सर्व आयटमची तुलना करता (एकूण आयटमचे दरात) लघुत्तम निविदा धारक असल्याने निविदेत नमूद केलेले सर्व आयटम आवश्यकतेप्रमाणे त्यांचे दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५५ विषय क्रमांक – ८
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/५१८/२०१३ दि.२३/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अभिलेख कक्षाचे कामकाज करणेसाठी श्री. प्रकाश किसनराव वीर, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांना ०६ महिने कालावधीसाठी दरमहा एकत्रित र.रु.१५,०००/- (र.रू.पंधरा हजार) इतक्या मानधनावर नियुक्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५६ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०७/५/२०१३ विभाग – प्रशासन

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/४२२/२०१३ दि.१०/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सध्या खातेनिहाय चौकशीची प्रलंबित प्रकरणे विचारात घेता, श्री.शां.वि.दरेकर यांना खातेनिहाय चौकशी अधिकारी या पदावर मुदतवाढ देणे आवश्यक असलेने शासन निर्णय दि.२८/१०/२००९ नुसार विभागीय चौकशी प्रकरणांमध्ये १ अपचारी गुंतलेला असलेस र.रु.८,०००/- व एकापेक्षा अधिक अपचारी गुंतलेले असलेस प्रत्येक जादा अपचा-यामागे र.रु. १,०००/- इतका मेहनताना अदा करुन (परंतु सदर वाढीव मानधनाची कमाल मर्यादा र.रु. १५,०००/- इतकी राहील) दि. २०/०४/२०१३ पासून पुढील १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ मिळण्यास मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५७ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०७/५/२०१३ विभाग – कामगार कल्याण

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.काक/२/कावि/१९६/२०१३ दि.२३/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

८ मार्च २०१३ जागतिक महिला दिन कार्यक्रमासाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.२२८६, दि.२२/२/२०१३ नुसार र.रू.१,६०,०००/- या अंदाजे रकमेस मंजुरी दिलेली असून सदर कार्यक्रमासाठी र.रू. १६,१६०/- एवढा जादा खर्च झालेला असल्याने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५८ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०७/५/२०१३ **विभाग – जनतासंपर्क व स्वागतकक्ष**

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक–मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जसं/५/कावि/२३९/२०१३ दि.२६/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जनतासंपर्क विभागामार्फत दि.११/१०/१२ रोजी मनपा वर्धापन दिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांकरीता प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह भाड्याने घेण्यात आले होते. याकामी र.रू.१२,१९१/- (र.रू. बारा हजार एकशे एक्याण्णव) इतका खर्च झालेला असल्याने कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३५९ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग– वैद्यकिय विभाग
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक–मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/३२५/२०१३ दि.५/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.अमोल अविनाश डुंबरे, यांना ऑन्को सर्जन या पदावर मानसेवीतज्ञ म्हणुन सहा महिने कालावधीसाठी वायसीएम रुग्णालयात प्रतिमहा र.रु.१,०००/- एकत्रित मानधनावर नियुक्तीकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक –३३६० विषय क्रमांक – १३
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग– वैद्यकिय विभाग
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक–मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/३३७/२०१३ दि.८/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ. दिपा दिलीप कंधारे यांना नेत्ररोग तज्ञ या पदावर आदेशाचे दिनांका पासुन ६ महिने या कालावधीकरिता प्रति महा र.रु.५०,०००/- एकत्रित मानधनावर तालेरा रुग्णालयात नेमणुक देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३६१ विषय क्रमांक – १४
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग– वैद्यकिय विभाग
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक–मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/३७६/२०१३ दि.३०/४/२०१३.
विषय - आनंद मेडिकल फौंडेशनचे नर्सिंग इन्स्टिटयुट विद्यार्थ्यांना प्रॅक्टीस करिता उपलब्ध करुन देणे बाबत..

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३३६२ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग–नगरसचिव
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक–मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नस/२/कावि/२२६/२०१३ दि.२६/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापौर परिषदेची वार्षिक वर्गणी र.रु.२०,०००/- ( अक्षरी र.रु. वीस हजार फक्त ) महाराष्ट्र महापौर परिषद यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.</u>-**

ठराव क्रमांक – ३३६३ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०७/५/२०१३ विभाग– जकात
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक–मा.छाया साबळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.जकात/३२/कावि/२०५/२०१३ दि.२०/४/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७७ (२) नुसार मनपाचे दापोडीगांव जकात नाक्यासाठी वापरात असलेल्या श्री.सुदाम धोंडिबा काटे व इतर यांचे मालकीच्या २३८.२५ चौ.मी.एवढया मोकळया जागेचे उपसंचालक नगर रचना यांनी प्रस्तावात ठरवून दिलेल्या दरानुसार (सदर जागेचे भूसंपादन होईपर्यंत) भाडे श्री.सुदाम धोंडिबा काटे व इतर यांना अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(नवनाथ दत्तू जगताप)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/४३६/२०१३
दिनांक - ०७/०५/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.